*Review Of Research*
Vol.2, Issue. 9, June. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

**ORIGINAL ARTICLE**

# *रामदास चवरे यांचे समिक्षालेखन*

*परमेश्वर म. पाटील*

संशोधन विद्यार्थी
मराठी विभाग कर्नाटक विद्यापीठ, धारवाड.

***सारांशः***

समीक्षेची व्याप्ती खूप मोठी मानली जाते. यात पुस्तकाचे अर्थात कलाकृतीची समीक्षा, परिक्षण, समालोचन, टिका, याचा समावेश समिक्षेत होतो. प्राचीन मराठी वाड.मयाचा अभ्यास करतांना मराठीत हा समिक्षा प्रकार विशेष करून आढळत नाही. काही अपवाद वगळता ' भरो ग्रंथु निका जाता, परि निवृत्ता जोगा नव्हेचि ,'सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिध्द तुक्याची ओवी ज्ञानेशाची, आर्या मयूर पंताची ' अशा प्रकारची पारमार्थिक निष्कर्ष वजा समिक्षा आढळून येताना दिसते. इतर साहित्य प्रवाहाबरोबरच इंग्रजी काळापासून हा प्रकार आर्थिक अंशाने विकस्मीत झाल्यासारखा वाटतो. ज्ञानशखांचा व धर्मप्रसारार्थ काढलेल्या नियतकालिकांमध्ये देखील काही समिक्षा आढळून आलेल्या दिसतात. पूर्वीची विविध ज्ञान विस्तार, मराठी ज्ञानप्रसारक, चंद्रोदय, तसेच सत्यकथा, अनुप्श्भु, मराठी साहित्य पत्रिका, प्रतिश्ठान, अस्मितादर्श, युगवाणी, गोरवाणी, अक्षरवैरभी अशा आधुनिक नियतकालिके व मासिके यातून स्वतंत्र परिक्षणे व समिक्षेची सदरे प्रसिध्द झालेली आहेत. संशोधक व अभ्यासकांना योग्य दिशा मिळवण्यासाठी यासारखा समिक्षापर लेखनाचा उपयोग होत असतो.

### *समीक्षेचे स्वरुप आणि विकास :–*

सर्वसाधारणपणे समिक्षेचे कालावादी, रूपवादी, सौंदर्यवादी, लौकिकतावादी, वास्तववादी, आदिबंधात्मक, आस्वादक, अलीकडील जीवनवादी अशा प्रकारच्या समिक्षा पध्दतीचे वर्गीकरण करता येईल. 1918 ते 1974 च्या कालखंडात लिहल्या गेलेल्या समिक्षेत प्राचीन साहित्यविचाराचा समावेश आढळतो. आजही अर्वाचीन साहित्याबरोबर प्राचीन साहित्य प्रकाराचाही वेध होण्याचा प्रयत्न केलेला आहे. अलिकडच्या समिक्षा प्रकारात नवीन लेखकांची दृष्टी जीवनाकडे बघण्याची विकसित झालेली आहे. सामान्य माणूस हा साहित्याभ्यासाचा व लेखनाचा केंद्रबिंदू मानून त्याभोवती समिक्षकांनी देखील जनवादी दृष्टीने मूल्यांचा वेध घेतलेला दिसून येतो. साहित्य अवलोकनातही जीवनवाद महत्वाचा मानला जातो. महणूनच समिक्षा व्यवहारातसुध्दा जीवनवादाचे महत्व दिसून येताना दिसते. या व्यवहारात व्यासंगीपणा असला म्हणजे तो अधिक गतिने समृध्द होत जातो. बहुतेक समिक्षकांच्या समिक्षेत त्याचा व्यक्तिसापेक्ष दृष्टीकोन प्रतिबिंबित होताना दिसतो. दि.के.बेडेकरांच्या मते, '' कलाकृतीची समिक्षा करित असतांना सामाजिक शास्त्राचे सहाय्य कसे गरजेचे ठरते, सौंदर्यामूल्य ही इतिहासनिश्ठ कशी असतात यासारख्या बाबीचा परामर्श होणे महत्वाचा ठरतो '' ||1 ||

स्वातंत्र्योत्तर अर्था 1960 नंतरच्या कालखंडात लघुमासिकांची चळवळ आणि ग्रामीण साहित्य, दलित साहित्य हे प्रवाह आर्थिक जोरकसपणे पुढे आलेले दिसतात. उदा. माधव आजवतांचे 'जास्वंद '(1974), 'रसस्वाद'(1978) हे टिकात्मलेखन याच काहात्ले ओळखले जाते. यांच्यातील समिक्षा सौंदर्यतत्वाधिष्ठित आस्वादक समिक्षा म्हटली जाते. द.ग. गोडसे यांच्या '' पोत ''(1963), शक्तिसौष्ठव (1972) इ. ग्रंथातूनि आशयावादी समिक्षा साकार होते. यांच्या एकूण विवेचनाच्या मागे 'समुहसापेक्षता' हे सुत्र आहे हे लक्षात येते. समिक्षा व्यवहारात सौंदर्य संकल्पनेचे आधिक मूलगामी विवेचन प्रभाकर पाध्ये यांच्या मते कलाकृतीत ज्या अनुभवाची प्रतिमांसह मांडणी असतो तो अनुभव कसदार असला पाहिजे. त्या अनुभवाने आपल्या मनातील चैतन्यशक्तीच्या मूलस्त्रोताला जाग आली पाहिजे. कलेचे हेच अंतिम कार्य आहे. प्रभाकर पाध्यें यांचा सौंदर्यविचार 'कलेची क्षितिजे' या ग्रंथातून व ' आस्वााद 'मधील ग्रंथ समिक्षेतून अधिक स्पष्ट झालेला आहे. पाध्ये यांच्या ' सौंदर्यानुभव '(1979) या ग्रंथात कलेचे अनुभव पूर्वतत्व, कलात्मक अनुभव, कलेचे प्रयोजन, प्रतिभा, आस्वाद आणि समिक्षा अशा बाबींचा परामर्श त्यांनी सखोलपणे घेतलेला दिसतो.

### *अक्षरलेणी ' समीक्षात्मक ग्रंथाचे मूल्यांकन :–*

रामदास चवरे यांच्या लेखनवैष्टियात मुळात जनवादी, आस्वादक, वास्तववादी समीक्षेचे दर्शन घडलेले दिसते. एकूण त्यांच्या समीक्षेची नाळ काव्यात्कतेशी जुळलेली दिसते. त्यामुळे ते समीक्षासारखा कठीण विशय ते सोपा करून सांगताना दिसतात. ' अक्षरलेणी ' हा त्यांचा स्वतंत्र समिक्षा लेखसंग्रह म्हणून प्रसिध्द आहे. या ग्रंथात एकूण तेरा समीक्षात्मक लेख समाविष्ठ असून हे लेख विविध प्रमाणित व दर्जेदार नियतकालिकांमधून प्रसिध्द झाले आहेत.

पुढीलप्रमाणे नामनिर्देशित केलेल्या लेखांवर त्यांनी वृत्तपत्र व नियतकालिकांमध्ये समीक्षा केलेली आहे ती अशी ''महाभारतातील कर्ण'', ''वैदर्भीय मराठी वाड.मयातील संशोधन आणि समीक्षा,'' ''वैदर्भीय ग्रामीण कथा,'' '' खळाळ एक निखळ ग्रामीण कथासंग्रह,''

**Title:** *रामदास चवरे यांचे समिक्षालेखन*
**Source:Review of Research [2249-894X]** *परमेश्वर म. पाटील* **yr:2013 vol:2 iss:9**

''थगाडा'',''झेलपार '', ''अंगणवाडी'', ''आटपाट '', ''आलेख'',''अकल्पित'', ''प्रतिबध्द आणि मर्त्य'',''आग'': एक समालोच'', इ. समीक्षा लेखांमध्ये विशयाची वैविधता असून त्यातून आशयगर्भ शैलीचा प्रयत्य आल्याशिवाय राहात नाही.

''ज्ञानेश्वरीतील सौंदर्य '' हा लेख दै. देशोन्नती अकोला आवृत्ती 19 जुलै 1992 या अंकात प्रसिध्द झाला होता. यात चवरे म्हणतात, '' मराठी संतानी महाराष्ट्राचे धार्मिक आणि सांस्कृतिक कालसापेक्ष पुररूत्थान केले असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरु नये. चारित्र आणि संयम, निर्धार आणि निष्ठा, नीती आणि निर्भयता जनमानसात सजविण्याचे श्रय या संतांना द्यावे लागेल. म्हणून संत मालिकेत ज्ञानेश्वर अध्वर्य आहेत. ते ज्ञानियांचे राजे, संतांचे संत आणि जन सामान्यांची माउली आहेत. ||2|| या लेखात रामदास चवरे यांनी सौंदर्यवादी दृष्टीकोनातून हळूवार मनाने आपले मनोगत व्यक्त केले आहे. यात त्यांच्यातील चोखंदळ रसिक डोकावत असला तरी त्याच्या सोबतच जाररूक समीक्षकही लक्षात येतो म्हणून ते लिहतात की, ज्ञानेश्वरांना जेवढी सत्य, मांगल्या आणि पावित्र्याची ओढ आहे तेवढीच सौंदर्याची देखील आहे. किंबहुना त्यांची ही गुणत्रयी सौंदर्यांच्या प्रभावीपणे डोकावताना दिसते. '' महाभारतातील कर्णः एक चिंतन '' या लेखात लिहीताना म्हणतात – महाकाव्याचा अभिजात गुणवैष्टियाने समृध्द असलेला महाभारत हा चिंतनाचा व अभ्यासाचा मौलिक विशय आहे. त्यातील प्रत्येक पात्र उलगडून त्यात मनोज्ञ दर्शन घडते. यातील कर्णाची भूमिका समजून घेण्यासारखी आहे. त्यांच्या आयुश्यातील तीन प्रसंग जिवंतपणे उभे केले आहेत. पहिली गोष्ट प्रलोभन, दुसरा पराक्रम आणि तिसरा पराभवानंतर त्यांच्या जीवनात जेंव्हा– जेंव्हा प्रलोभनवाले क्षण आले तेंव्हा तेंव्हा त्यावेळी त्याचा पराभव झालेला आहे. उदा. दक्षिण गोग्रहण प्रसंग, द्वेतवन प्रसंग इ. मूलतः कर्ण हा शूर आणि पराक्रमी आहे. परंतू दुर्योधनाच्या सहवासात राहून या सोन्याची माती झाली. दुर्योधनाने त्याला आपले अंकित केले होते. त्याने त्याला अंगदेशाचे राज्य देवून राजपद बहाल केले होते. कर्ण हा सच्चा मित्र होता. तो दुर्योधनाचे उपकार कधीही विसरणारा नव्हता. त्यामुळे ब–या वाईट कोणत्याही प्रसंगाना तो दुर्योधनाला साथ देत होता. अशा सर्व घटना, प्रसंग आपल्या लेखात अभ्यासपूर्ण रितीने मांडला असून कर्णाच्या मर्यादा, त्याचे सामर्थ्य आणि तटस्थ वृत्तीने केलेले चित्रण वाचकाला अंतर्मुख करते.

डॉ. चवरे यांनी साठोत्तरी साहित्य प्रवाहांचा सूक्ष्मपणे वेध घेतलेला आहे, ' वैदभीर्य ग्रामीण कथा ' या समिक्षा लेखात कित्येक नामवंत कथाकारांच्या कथांचा सरस कृतीने समालोचन केलेले आहे. वामन चोरघडे, कुसमावती देशपांडे, उध्दव शेळके, मनोहर तव्हर, बाजीराव पाटील, वामन इंगळे, बाबाराव मुसळे, प्रतिभा इंगोले इ. कथाकारांच्या कथेच्या वृत्ती प्रकृत्तीचा त्यांनी शोध घेतलेला दिसतो. प्राचीन साहित्यापासून ते अर्वाचीन साहित्यातील विविध कलाकृतीचा त्यांनी उत्स्फूर्तपणे आणि उत्कटतेने वेध घेतलेला आहे.

समीक्षेच्या संदर्भात चवरे म्हणतात, '' आजच्या संदर्भात गेल्या शंभर वर्षातील समीक्षेचा आढावा घेताना जाणवते की आता केवळ कलावादी समीक्षा मागे पडू पाहत आहे. वाड.मयाच्या विविध प्रवाहात नित्य नवोन्मेशाने फुटणारे धुमारे कवेत होण्यासाठी बाहू विस्फारणारी समीक्षा पुढे येत आहे. भविष्यातील समीक्षेविषयी सांगावयाचे झाल्यास विविध प्रवाहाच्या पृथगात्मकतेपासून मुक्त असलेली मानुशतेच्या युगधर्माने सन्मानित झालेली समीक्षा पुढे भक्कमपणे उभी राहिल असे वाटते ||3||

'' आलेख '' या सुभाष खंदारे यांच्या काव्यसंग्रहाचे समीक्षा लेखन अतिशय आस्वादकपणे केलेले आहे. या काव्यसंग्रहातील दलित साहित्यातील शोशीत वृत्तीवर प्रकाश टाकून वाचकांना अंतर्मुख करायला लावले आहे.

'' नेसायचे कपडे दाटतील
तेंव्हा सगळी ठिगळं फाटतील
अंग अंग उघडं होइल
मग नवा अंगरखा शिवता येईल. ''

या कवितेचे मुल्यमापन करतांना चवरे लिहतात, '' अशा सहतेने समुचित, सिमित शब्द व्यंगातून दैन्य रेखाटनाला आगळाच गहिरेपणा प्राप्त होतो. मात्र कवचीची उत्थापनाची ओढ दुर्दम्य असते. या शोषीत अंधारातून प्रवासणा–या प्रवाशाला आपल्या अवतीभवतीचा अंधार हा पहाटेपूर्वीचा असल्याची जाणीव असते. त्याचे उोळे लवकरच उद्भवणा–या निळया पहाटेकडे लागलेले असतात. ||4|| सुभाष खंदारे यांच्या कवितांमध्ये समाजप्रबोधन हा तिचा सुप्त संदेश आहे. जीवन वणव्यात होरपळणा–या जीवांची काहिली बघितली म्हणजे हृदयाचा ठोका चुकतो. कवी मात्र शोषणाविरूध्द आवाज उठवतो. ते म्हणतात –

'' तुहा घरधनी अडवा
माते चपलीनं बडवा
नाही तं मातीत लोळवा ''

वरील रचनेत मार्मिकते बरोबरच शाब्दिक चमत्कृतीही डोकावातांना दिसते. डॉ. चवरे या संदर्भात म्हणतात, '' जुन्या काव्यपंक्तिची मोडतोड करून त्याऐवजी प्रखर वर्तमान वास्तवतेचे भेदक दर्शन घडविणा–या या झळकत्या नवीन ओळी वाचून सहजच मर्ढेकरी कवितेचे स्मरण होते. येथील जीवनवेता जीवघेण्यात आहेत. मात्र त्यांच्या आविश्कारात संयम व शब्दांचा मालक व्यय आहे. या मालक शब्द संहितेतून आशयाची खोली तिच्या मूळ वेदनेसह डोळयासमोर उभी राहते ||5||

' अक्षरलेणी ' मधील विविध लेखाची समीक्षा करतांना चवरे यांनी दलित, ग्रामीण अशा साठोत्तरी साहित्य प्रवाहाचा नेमकेपणाने अभ्यासपूर्ण वेध घेतलेला दिसतो. डॉ. बाबुराव गायकवाड यांच्या ''स्पंदन '' कविता संग्रहाचे त्यांनी केलेले समीक्षण त्याच्या अभ्यासू वृत्तीचे द्योतक आहे. आस्वाद समीक्षेचा तो एक उत्कृष्ट नमुनाही म्हणता येईल. विशेष म्हणजे त्यातून त्यांची तटस्थ आणि वास्तववादी दृष्टी प्रकर्शाने दिसून येते. ' स्पंदन ' या कविता संग्रहाविषयी ते लिहतात – ''तसे पाहिल्यास प्रत्सुत कविता ही दलित जाणिवेची कविता आहे. मात्र येथे दलितत्वाचे वर्तुळ पाहता पाहता विस्तारत जावून अखिल शोशित, पीडीत मानवतेला कवेत घेते. दलितत्व, ग्रामीणत्व अशा विशिष्ठ वैशिष्ठयपूर्ण वर्तुळांना भेदून व्यापक जनजीवनाला सन्मानीत करणारी कविता ही जनकविता होते. येथे '' जनसामान्य हाच आद्य–मध्य–केंद्र बिंदू आहे. या कवितांमध्ये केवळ विद्रोहाची जाणीव नाही तर शोषण नाहिशी करणारी असोणी आहे. '' ||6||

' अक्षरलेणी ' समीक्षा लेख संग्रहात साहित्याचा शोध घेणे ही जाणिव ठेवून चवरे समीक्षा लिहितात– नेमकेपणा, अल्पक्षरत्व, विषयाच्या खोलात प्रवेश करते, आशय आणि अभिव्यक्तीचा शोध घेणे इ. बाबी त्यांच्या समीक्षा लेखात दिसून येतात. त्यांच्या समीक्षा ग्रंथातून दलित, शोषित समाजाची जाणीव निर्माण होवून वाचकाला संशोधनासाठी नवी दिशा प्राप्त होवू शकते.

***निष्कर्ष :–***

1.'अक्षरलेणी' मधील सर्व लेख विविध विषयांवर प्रकाशन टाकणारे आहेत. त्यामुळे ते आशयपूर्ण ठरले आहेत.
2.'अक्षरलेणी' मध्ये प्राचीन आणि अर्वाचीन विषयांवरील लेखांचा उल्लेख आढळतो. या समीक्षणात्मक लेखसंग्रहातून प्राचीन आणि अर्वाचीन

विषयांना डॉ. चवरे यांनी समर्थपणे न्याय दिलेला दिसतो.
3.अर्वाचीन साहित्यातील दलित प्रतिभा आणि दलितेत्तर प्रतिभांचा डॉ. चवरे सारखाच समरसतेने वेध घेतांना दिसतात.
4.'अक्षरलेणी' या समीक्षा ग्रंथातून त्यांच्या ठायी असलेल्या तटस्थ, निरपेक्ष समीक्षणात्मक जाणिवांचा समर्थ प्रत्यय येतो.
5.'अक्षरलेणी' मधील विविधांगी समीक्षा लेखामधून डॉ. चवरे यांनी दलित, ग्रामीण अशा साठोत्तरी साहित्य प्रवाहांचा सूक्ष्मतेने व चिकित्सकवृत्तीने वेध घेतलेला दिसतो.

*संदर्भ ग्रंथ :–*

1.मराठी विश्वकोश, म.ना. अदवंत, खंड 32: पृष्ठ 1269
2.' साहित्य साधना ' डॉ. रामदास चवरे, अनुबंध प्रकाशन, अकोट 1994 पृष्ठ 1
3.तत्रैव – पृष्ठ 38
4.तत्रैव – पृष्ठ 73
5.'अक्षरलेणी' रा.गो. चवरे, अनुबंध प्रकाशन आकोट, 1994, पृष्ठ 72
6.'अक्षरलेणी' रा.गो. चवरे, अनुबंध प्रकाशन आकोट, 1994, पृष्ठ 1